
132


**Publisher & Owner**
Archana Rajendra Ghodke

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra)
vidyawarta@gmail.com
Cell : 098 50 20 32 95
075 88 05 76 95

**& Edit By**
Dr.Gholap Bapu Ganpat




ISSN 2394-530


₹ 400/-

133

# समकालीन भारतीय लोकशाही

(CONTEMPORARY INDIAN DEMOCRACY)



संपादक

**डॉ. दिपाली एस. घोगरे**

| | | |
|---|---|---|
| 15 | Challenges To Contemporary Indian Democracy<br>**Asst Prof. Angela Diase Rodrigues** | 106 |
| 16 | लोकतंत्र एवं नक्सलवादी आंदोलन<br>**डॉ. एस. के. गोयल** | 112 |
| 17 | भारतीय मौलिक अधिकारों की माँग और उसकी विशेषताए<br>**प्रा.डॉ.अतुल नारायण खोटे** | 119 |
| 18 | भारतीय लोकतंत्र में मौलिक अधिकारों का महत्व<br>**डॉ. कृष्णा सोलंकी** | 123 |
| 19 | भारतीय संविधानाची उद्देशपत्रिका:स्वरूप व महत्व<br>**डॉ. दिपाली श्रीराम घोगरे** | 127 |
| 21 | महिला सक्षमीकरण व राष्ट्रीय धोरण<br>**डॉ. नारायन एम. वघाळे** | 137 |
| 21 | भारतीय लोकशाहीत माध्यमांची भूमिका<br>**प्रा. डॉ. छाया शशिपाल शिंदे** | 147 |
| 22 | भारतीय संविधानातील 'मानवी हक्काची तरतूद'<br>**सहाय्यक प्रा. डॉ. रवी एस. सोरते** | 158 |
| 23 | भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने<br>(भ्रष्टाचार, काळा पैसा, राजकारणाचे गुन्हेगारीकरण)<br>**प्रा. डॉ. बबिता येवले** | 172 |
| 24 | ***भारतीय लोकशाही : एक आव्हान डॉ. संजय गव्हाणे*** | 180 |
| 25 | भारतीय लोकशाहितील न्यायीक सक्रियता<br>**प्रा. डॉ. संजय एम. अवधुत** | 185 |
| 26 | भारतीय लोकशाहीतील मुलभूत हक्कांचे महत्व<br>**प्रा.मिलींद खांदवे** | 190 |
| 27 | भारतीय लोकशाहीचे भवितव्य<br>**प्रा.डॉ.माधव केरबा वाघमारे** | 200 |

# भारतीय संविधानाची उद्देशपत्रिका : स्वरूप व महत्व

डॉ. दिपाली श्रीराम घोगरे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख ,डॉ. एच.एन. सिन्हा कला व वाणिज्य महाविद्यालय,पातूर जि.अकोला

---

**प्रस्तावना :**

प्रत्येक राज्याची निश्चित असे काही उद्दिष्टये असतात आणि या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी राज्यातील सर्वश्रेष्ठ विधिनियम या नात्याने घटना तयार केली जात असते. लिखित स्वरूपाच्या संविधानात त्या देशातील भविष्याच्या वाटचालीचा उल्लेख रेखाटलेला असतो. भारतीय संविधानकारकांनी ज्या उद्दिष्टांना, प्रेरणांना समोर ठेवून संविधानाची निर्मिती केली ती उद्दिष्टये साध्य होण्याच्या हेतूने आणि संविधानाचा आशय थोडक्यात स्पष्ट होण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल अशी उद्देशपत्रिका संविधानाच्या प्रारंभी जोडली आहे. घटनाकारांच्या अंत:करणाचा ठावा घेण्याचे गुरूस्थान म्हणून या उद्देशपत्रिकेकडे पाहीले जाते. भारताच्या राष्ट्रीय पुढा—यांनी अनेक दिवसांपर्यंत उराशी बाळगलेली स्वप्ने या उद्देशपत्रिकेच्या निमित्ताने त्यांना बोलती करता आली. संविधानाचा प्राण किंवा आत्मा असलेल्या या उद्देश पत्रिकेला संविधनाची प्रास्ताविका किंवा संविधानाचा सरनामा असेही म्हणतात. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटनापरिषदेने ही उद्देशपत्रिका मंजुर करून घटनेला मान्यता दिली. घटनेच्या सुरूवातीलाच जोडण्यात आलेल्या ही उद्देशपत्रिका पुढीलप्रमाणे आहे.

**उद्देशिका:**

'आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम' समाजवादी धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय; विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य; दर्जा व संधीची समानता; निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व

राष्ट्राची एकता व एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता, प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून; आमच्या संविधान सभेत आज दिनांक २९ नोव्हेंबर १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमीत करून स्वतःप्रत अर्पण करत आहोत'

१९७६ साली झालेल्या ४२ व्या संविधान विशोधनानुसार उद्देशपत्रिकेत समाजवादी, धर्मनिरपेक्ष व राष्ट्रीय एकात्मता हे शब्द नव्याने समाविष्ट केलेले आहेत. अनेक मान्यवरांनी या उद्देशपत्रिकेबद्दल आनंद व्यक्त केले आहेत. या उद्देशपत्रिकेवरून पुढील गोष्टी स्पष्ट होतात.

१) संविधानाचे उगमस्थान

२) राज्यव्यवस्थेचे स्वरूप

3) राज्यव्यवस्थेची उद्दिष्टये

**१) संविधानाचे उगमस्थान .भारतीय जनता:**

"आम्ही भारतीय लोक" (we are people of India) हे उद्देशप्रत्रिकेतील प्रारंभिचे शब्द तसेच "आमच्या संविधान सभेत हे संविधान तयार करून, मान्य आणि स्वीकृत करून स्वतःप्रत अर्पन करीत आहोत". हे शेवटचे वाक्य यावरून संविधानाचे उगमस्थान भारतीय जनता आहे हे स्पष्ट होते. अशी उद्देशपत्रिकेची सुरूवात व शेवट अर्थपूर्ण आहे.

भारतीय जनतेने संविधान निर्माण केलेले असल्यामुळे ते त्यांच्यावर कोणी लादलेले नाही असे उद्देशपत्रिकेतून स्पष्ट होते. वास्तविक भारतीय संविधान हे संविधन समितीने निर्माण केलेले आहे. शिवाय संविधान समितीचे प्रतिनिधी जनतेकडून निवडलेले नव्हते तर कॅबिनेट मिशन योजनेनुसार अप्रत्यक्ष मतदान पध्दतीने या प्रतिनिधीची निवड झाली होती.

तसेच घटना तयार झाल्यावर ती जननिर्णयाकरीता टाकण्यात आली नाही, म्हणून ही घटना खरोखरच जनतेने तयार, मान्य व स्विकृत केली काय? ज्या घटना परिषदेने ही घटना मंजुर केली ती परिषद खरोखरच प्रतिनिधीक होती का? अशा अनेक शंका व टिका झाल्या.





पण म्हणून ही घटना जनतेला मान्य नव्हती असा समज मुळीच होऊ कामा नये. या घटनेला जनतेचा पाठींबा होता कारण लोकांना ही राज्यघटना मान्य नसती तर त्यांनी १९५१–५२ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांवर बहिष्कार घातला असता. पण असे काहीही न घडता लोकांनी या सार्वत्रिक निवडूकांना चांगला प्रतिसाद दिला आणि घटना परिषदेच्या जेवढया सभासदांनी निवडणूका लढविल्या त्यापैकी जवळ जवळ सर्व सभासद एकतर लोकसभेवर किंवा विधानसभेवर निवडून दिलेत. यावरून घटना परिषद प्रतिनिधीक होती व संविधानाला जनतेचा पाठींबा होता ही गोष्ट सिध्द होते. आतापर्यंत झालेल्या सार्वत्रिक निवडणूका आणि राजकारणाचा कानोसा घेता भारतीय जनतेला हे संविधान मान्य असून कायदेशीर व नैतिकदृष्टया हे संविधान जनतेवर बंधनकारक आहे. भारतीय जनतेनेही संविधानाचे पावित्र्य टिकवून तिचा आदर ठेवलेला आहे. असाच निष्कर्ष काढता येतो.

"या घटनेचे उगमस्थान भारतीय जनता असावी. तसेच घटनेची शक्ती व सार्वभौम सत्ता ही सुध्दा भारतीय जनतेकडून प्राप्त झालेली असावी ही सभागृहाच्या प्रत्येक सभासदाची इच्छा उद्देशपत्रिकेत ग्रंथित करण्यात आली आहे असे मला वाटते". हे उदगार डॉ. आंबेडकरांनी १९४७ साली घटनापरिषदेत काढले होते. त्याला आव्हान देण्याचा प्रयत्न खचितच आज कोणीही करणार नाही. कारण संविधान समितीतील लोकप्रतिनिधींनी भारतीय जनतेमार्फत केलेली ही सार्वभौम कृती आहे.

**२) राज्यव्यवस्थेचे स्वरूप**

भारतीय राज्य व्यवस्थेचे स्वरूप कसे राहील याचा उल्लेख संविधानाच्या उद्देशपत्रिकेत केलेला आहे. भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेत भारताचे सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य निर्माण करण्याचे ठरविले आहे. या महत्वाच्या शब्दरचनेतून राज्याचे स्वरूप व गुणवैशिष्टये प्रगट होतात. मुळ उद्देशपत्रिकेत केवळ "सार्वभौम प्रजासत्ताक गणराज्य" एवढेच शब्द होते. इंदिरा गांधीच्या

प्रेरणेने संसदेत १९७६ साली केलेल्या ४२ व्या संविधान विशोधनाने त्यात 'समाजवादी' व 'धर्मनिरपेक्ष' या दोन शब्दांची भर घातली. भारतीय राज्य व्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करणारी वैशिष्टये पुढील प्रमाणे:

### १) सार्वभौम (Soverign)

भारत सार्वभौम आहे अर्थात कोणत्या परकीय राष्ट्राच्या नियंत्रणापासून तो मुक्त आहे. 15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला ब्रिटिश सत्तेपासून स्वातंत्र्य मिळाले. तत्पूर्वी भारताचा राजकीय दर्जा वसाहतीचे राज्य असा होता. मात्र संविधान अंमलात आल्यापासून भारत हे सार्वभौम राज्य बनले. सर्वोच्च अंतिम सत्ता जेव्हा राज्यातच वास करीत असते व दुस–या कोणत्या सत्तेला ते बांधलेले नसते तेव्हा ते राज्य सार्वभौम असते असे मत न्या.कुली, यांनी व्यक्त केले आहे. त्यानुसार अंतर्गत कारभार व बाहय व्यवहारात भारत हे अमेरिका, ब्रिटन इत्यादी देशांइतकेच स्वतंत्र सार्वभौम आहे. भारत अजुनही राष्ट्रकुलाचा सभासद असला तरी त्यामुळे भारताच्या सार्वभौमत्वास बाधा येत नाही कारण भारताने राष्ट्रकुलाचे सभासदत्व स्वेच्छेने कायम ठेवले आहे.

### २) समाजवादी (Socialist)

उद्देशपत्रिकेत भारतीय राज्य व्यवस्थेचे वर्णन समाजवादी राज्यव्यवस्था असे करण्यात आले आहे. भारतीय जनतेचे दारिद्रय, विशमता, शोषण, बेरोजगार यापासून निराकरण करण्याची जबाबदारी इथल्या राज्यकर्त्याची आहे. असा हेतू समाजवादी शब्द उद्देशत्रिकेत घालवण्यामागे स्पष्ट होता.

भारतीय जनतेचे राहणीमान सुधारण्यासाठी सामाजिक समता व आर्थिक न्याय प्रस्तापित होणे आवश्यक आहे. त्यासाठी घटनाकारांनी घटनेच्या कलम ३९ ते ५१ मध्ये निती निर्देशक तत्वे टाकली आहेत त्याचाच बोध समाजवादी हा शब्द आपल्याला करून देतो. मिश्र अर्थव्यवस्था स्विकारल्याने देशात एका बाजुला भांडवलदारांची मक्तेदारी तर दुस–या बाजूला सामान्य जनतेचे दारिद्रय वाढू लागले आहे. त्यासाठी शक्य त्या प्रमाणात उत्पादन साधणे सामाजिक मालकीची करणे, खाजगी उद्योगांचे राष्ट्रीयकरण करणे, सार्वजनिक





उद्योगात वाढ करणे, सामाजिक व आर्थिक समता प्रस्तापित क जनतेच्या राहणीमानाचा दर्जा उंचावणे, नागरिकांना उपजिविकेची स उपलब्ध करून देणे, जनतेचा शैक्षणिक व सांस्कृतिक विकास करणे, उत्पन्नाचे न्याय वितरण करणे इत्यादी काम राज्यकर्त्याकडून अपेक्षीत आहेत.

### ३) धर्मनिरपेक्ष (Secular)

४२ व्या विशोधनाने धर्मनिरपेक्ष या नव्या शब्दाचा उद्देशपत्रिकेत समावेश केला आहे. भारतीय संविधानाच्या कलम २५–२८ मध्ये स्पष्ट केलेल्या धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकाराचे प्रतिनिधीत्व धर्मनिरपेक्ष हा शब्द करतो असेच म्हणावे लागेल.

भारताची राज्यव्यवस्था धर्मनिरपेक्ष असावी आणि लहान मोठया सर्व धर्माच्या अनुयायांना समाज संधी, दर्जा व वत्रणूक मिळावी हा त्यामागचा हेतू आहे. भारतीय राज्य व्यवस्था धर्मनिरपेक्ष आहे. याचाच अर्थ असा की, राज्यव्यवस्थेचा विशिष्ट असा एक धर्म असणार नाही. राज्यव्यवस्था कोणत्याही धर्माला बांधलेली असणार नाही. राजकीय प्रक्रियांमध्ये धार्मिक शक्तींना लुडबूड करता येणार नाही. राज्याच्या कार्यात तसेच कायद्यासमोर धर्माच्या आधारे भेदभाव केला जाणार नाही.

वास्तवत: मात्र या तत्वाची काटेकोर अंमलबजावणी शक्य झालेली नाही, कारण अनेक अल्पसंख्यांक नागरीकांच्या भावनांचा किंवा धार्मिक संकल्पनांचा अपमान होवू नये म्हणून कायद्याची अंमलबजावणी करतांना धर्माच्या आधारे भेदभाव होतांना दिसतो. त्यामुळे धर्मनिरपेक्षता हे तत्व खऱ्या अर्थाने अंमलात येवू शकले नाही. एकंदरीत संविधानाच्या सरनाम्यात धर्मनिरपेक्ष राज्याची कल्पना स्विकारतांना व्यक्तीला धर्म असेल पण राज्याचा धर्म असणार नाही. या भूमिकेतून सर्व धर्मांना समान मानण्याचा दृष्टीकोन संविधानाने अंगिकारला आहे.



137

प्रेरणेने संसदेत १९७६ साली केलेल्या ४२ व्या संविधान विशोधनाने त्यात 'समाजवादी' व 'धर्मनिरपेक्ष' या दोन शब्दांची भर घातली. भारतीय राज्य व्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करणारी वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे:

**१) सार्वभौम (Soverign)**

भारत सार्वभौम आहे अर्थात कोणत्या परकीय राष्ट्राच्या नियंत्रणापासून तो मुक्त आहे. 15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला ब्रिटिश सत्तेपासून स्वातंत्र्य मिळाले. तत्पूर्वी भारताचा राजकीय दर्जा वसाहतीचे राज्य असा होता. मात्र संविधान अंमलात आल्यापासून भारत हे सार्वभौम राज्य बनले. सर्वोच्च अंतिम सत्ता जेव्हा राज्यातच वास करीत असते व दुस—या कोणत्या सत्तेला ते बांधलेले नसते तेव्हा ते राज्य सार्वभौम असते असे मत न्या.कुली, यांनी व्यक्त केले आहे. त्यानुसार अंतर्गत कारभार व बाह्य व्यवहारात भारत हे अमेरिका, ब्रिटन इत्यादी देशांइतकेच स्वतंत्र सार्वभौम आहे. भारत अजुनही राष्ट्रकुलाचा सभासद असला तरी त्यामुळे भारताच्या सार्वभौमत्वास बाधा येत नाही कारण भारताने राष्ट्रकुलाचे सभासदत्व स्वेच्छेने कायम ठेवले आहे.

**२) समाजवादी (Socialist)**

उद्देशपत्रिकेत भारतीय राज्य व्यवस्थेचे वर्णन समाजवादी राज्यव्यवस्था असे करण्यात आले आहे. भारतीय जनतेचे दारिद्रय, विशमता, शोषण, बेरोजगार यापासून निराकरण करण्याची जबाबदारी इथल्या राज्यकर्त्याची आहे. असा हेतू समाजवादी शब्द उद्देशत्रिकेत घालवण्यामागे स्पष्ट होता.

भारतीय जनतेचे राहणीमान सुधारण्यासाठी सामाजिक समता व आर्थिक न्याय प्रस्तापित होणे आवश्यक आहे. त्यासाठी घटनाकारांनी घटनेच्या कलम ३९ ते ५१ मध्ये निती निर्दशक तत्वे टाकली आहेत त्याचाच बोध समाजवादी हा शब्द आपल्याला करून देतो. मिश्र अर्थव्यवस्था स्विकारल्याने देशात एका बाजुला भांडवलदारांची मक्तेदारी तर दुस—या बाजूला सामान्य जनतेचे दारिद्रय वाढू लागले आहे. त्यासाठी शक्य त्या प्रमाणात उत्पादन साधणे सामाजिक मालकीची करणे, खाजगी उद्योगांचे राष्ट्रीयकरण करणे, सार्वजनिक



उद्योगात वाढ करणे, सामाजिक व आर्थिक समता प्रस्तापित करणे, जनतेच्या राहणीमानाचा दर्जा उंचावणे, नागरीकांना उपजिविकेची साधने उपलब्ध करून देणे, जनतेचा शैक्षणिक व सांस्कृतिक विकास करणे, उत्पन्नाचे न्याय वितरण करणे इत्यादी काम राज्यकर्त्याकडून अपेक्षीत आहेत.

**३) धर्मनिरपेक्ष (Secular)**

४२ व्या विशोधनाने धर्मनिरपेक्ष या नव्या शब्दाचा उद्देशपत्रिकेत समावेश केला आहे. भारतीय संविधानाच्या कलम २५—२८ मध्ये स्पष्ट केलेल्या धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकाराचे प्रतिनिधीत्व धर्मनिरपेक्ष हा शब्द करतो असेच म्हणावे लागेल.

भारताची राज्यव्यवस्था धर्मनिरपेक्ष असावी आणि लहान मोठया सर्व धर्माच्या अनुयायांना समाज संधी, दर्जा व वत्रणूक मिळावी हा त्यामागचा हेतू आहे. भारतीय राज्य व्यवस्था धर्मनिरपेक्ष आहे. याचाच अर्थ असा की, राज्यव्यवस्थेचा विशिष्ट असा एक धर्म असणार नाही. राज्यव्यवस्था कोणत्याही धर्माला बांधलेली असणार नाही. राजकीय प्रक्रियांमध्ये धार्मिक शक्तींना लुडबूड करता येणार नाही. राज्याच्या कार्यात तसेच कायद्यासमोर धर्माच्या आधारे भेदभाव केला जाणार नाही.

वास्तवत: मात्र या तत्वाची काटेकोर अंमलबजावणी शक्य झालेली नाही, कारण अनेक अल्पसंख्यांक नागरीकांच्या भावनांचा किंवा धार्मिक संकल्पनांचा अपमान होवू नये म्हणून कायद्याची अंमलबजावणी करतांना धर्माच्या आधारे भेदभाव होतांना दिसतो. त्यामुळे धर्मनिरपेक्षता हे तत्व खऱ्या अर्थाने अंमलात येवू शकले नाही. एकंदरीत संविधानाच्या सरनाम्यात धर्मनिरपेक्ष राज्याची कल्पना स्विकारतांना व्यक्तीला धर्म असेल पण राज्याचा धर्म असणार नाही. या भूमिकेतून सर्व धर्मांना समान मानण्याचा दृष्टीकोन संविधानाने अंगिकारला आहे.

**४) लोकशाही (Democratic)**

राज्यव्यवस्थेसंबंधी वापरण्यात आलेल्या लोकशाही शब्द सुध्दा महत्वाचा आहे. ज्या शासन व्यवस्थेत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सर्व वयस्क नागरीकांना राज्य कारभार चालविण्यात भाग घेता येतो. अशा शासन व्यवस्थेला लोकशाही राज्यव्यवस्था म्हणता येईल. अर्थात भारतात राज्यकारभार लोकमतानुसार राहील अशी हमी उद्देशपत्रिकेत लोकशाही हा शब्द वापरून दिलेली आहे.

संविधानकारकांनी राजकीय लोकशाहीतून सामाजिक लोकशाही प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट गृहीत धरले होते. डॉ. आंबेडकरांना सामाजिक लोकशाही अभिप्रेत होती. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्वे राजकीय लोकशाहीत असतील तर सामाजिक लोकशाही प्रस्थापित होवू शकते असे त्यांचे मत होते. भारताची राज्यव्यवस्था लोकशाही स्वरूपाची असल्याचे, सार्वत्रिक प्रौढ मताधिकार, मार्गदर्शक तत्वे, सर्वपातळीवर जनप्रतिनिधीक शासन हया संविधानातील तरतुदीवरून स्पष्ट होते.

**५) गणराज्य (Republic)**

राज्यप्रमुख हा लोकनियुक्त राहील असा अर्थबोध गणराज्य या शब्दापासून होतो. लोकशाही व्यवस्थेत राज्यप्रमुख हा नेहमी लोकनियुक्तच असतोच असे नाही. ब्रिटनमध्ये लोकशाही असूनही राज्यप्रमुख असलेला राजा हा अनुवांषिकतेच्या तत्वानुसार पदावर येतो. मात्र गाणराज्यात राज्यप्रमुख हा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या लोकांनी नियुक्त केलेला असतो. या अर्थाने भारताने गणराज्य पध्दतीचा स्विकार केला आहे. भारताचे राज्यप्रमुख असलेले राष्ट्रपती हे अनुवंशीकतेच्या आधारे पदावर येत नाहीत तर ते जनतेमार्फत अप्रत्यक्षपणे निवडले जातात.

**3) राज्यव्यवस्थेची उद्दिष्टये**

उद्देशपत्रिकेच्या तिसऱ्या भागात घटनेने निर्माण होणाऱ्या राज्य व्यवस्थेची उद्दिष्टये काय राहतील याचा खुलासा आढळतो. न्याय, समता, स्वातंत्र्य व बंधुता ही चार उद्दिष्टये उद्देशपत्रिकेने डोळयासमोर ठेवली आहेत.





**१) न्याय : सामाजिक, आर्थिक व राजकीय**

भारतीय संविधानच्या उद्देशपत्रिकेत असलेली न्याय ही संकल्पना सर्वात महत्वाची आहे. न्याय म्हणजे एखाद्या व्यक्ती किंवा बहूसंख्य लोकांचे हित नसून संपूर्ण समाजाचें हित साध्य करणे होय. महत्तम समाजकल्याण साधने हाच न्यायाचा हेतू असतो. त्यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीला विकासाची संधी उपलब्ध करून देणे म्हणजे खऱ्या अर्थाने न्याय देणे होय. संविधानाकारकांनी भारतीय नागरीकांना सामाजिक आर्थिक व राजकीय न्यायाची हमी दिली आहे. त्याकरीता अनेक तरतुदी संविधानात केल्या आहेत.

नागरीकांना दिलेल्या प्रौढमताधिकार, निवडणूक लढविण्याचा अधिकार देणे तसेच शासनाच्या अन्यायी धोरणांना विरोध करण्याचा अधिकार देवून राजकीय न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न संविधानकारकांना केला आहे. तसेच समतापूर्ण समाज व्यवस्था, कलम १४ नुसार कायद्यासमोर समता व कायद्याचे सर्वांना समान संरक्षण १५ नुसार भेदभावास बंदी, कलम १६ नुसार दर्जा व संधीची समता, कलम १७ नुसार अस्पृश्यता निवारण, कलम १८ नुसार किताब व पदव्यांची समाप्ती तसेच मार्गदर्शक तत्वात स्त्री—पुरूष समानता, समान कामास समान वेतन आर्थिक विषमता नष्ट करणे अशा तरतुदी करून घटनाकारांनी अनुक्रमे सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला हे उद्देशपत्रिकेतील न्याय या संकल्पनेवरून स्पष्ट होते.

**स्वातंत्र्य:**

भारताच्या सर्व नागरिकांना विचार अभिव्यक्ती, विश्वास, उपासना व श्रध्दा या बाबत स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याचे शासन व्यवस्थेचे उद्दिष्ट राहील असे उद्देशपत्रिकेत नमूद केले आहे. राज्यघटनेच्या कलम १२—३५ मध्ये असलेल्या मुलभूत अधिकाराच्या रूपात हे स्वातंत्र्य साकार झालेले आहे.

व्यक्तीच्या व्यक्तीमत्व विकासासाठी आवश्यक सोंई सवलती व संधी उपलब्ध असते व परिस्थितीनुसार त्याला निवडण्याची सोय असणे हा स्वातंत्र्याचा अर्थ आहे. अर्थात स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार

नाही या अर्थाने भारतीय नागरीकांना कलम १९ ते २२ मध्ये स्वातंत्र्याचा अधिकार देवून त्यावर उचित बंधने घालण्यात आली आहेत. तसेच त्यांना दिलेल्या स्वातंत्र्याचे आणि त्यांच्या संरक्षणात्मक उपयाचे स्पष्टीकरण दिलेले आहे.

**३) समता:**

भारतीय नागरीकांना दर्जा आणि संधीबाबत समतेची वागणूक मिळावी या दृष्टीने उद्देशपत्रिकेत समता या तत्वाचा पुरस्कार केला आहे. या तत्वाला अनुसरून संविधानाच्या कलम १४ ते १८ मध्ये समतेच्या अधिकाराचा समावेश केला आहे. त्यानुसार कायदा सर्वांसाठी समान असून कायद्याचे सर्वांना समान संरक्षण असेल. सार्वजनिक सेवा व पदे भरतांना सर्वांना समान संधी दिली जाईल, सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी कलम १७ मध्ये अस्पृषता निवारणाची तरतुद केली आहे. तसेच दर्जाची समता प्रस्तापित होण्यासाठी कलम १८ नुसार पदव्या व किताबांची समाप्ती केलेली आहे. येथे समता म्हणजे सर्व बाबतीत सारखे पण असा अर्थ होत नाही किंवा विविधता नष्ट करणे असाही समतेचा अर्थ नाही. तर कायद्याच्या नजरेत सर्व समान असेल व प्रत्येक व्यक्तीच्या सुप्त गुणांचा विकास होण्यासाठी राज्य सर्वांना समान संधी देईल.

**बंधुता:**

भारतात विविध जातीचे, धर्माचे, भाषांचे लोक राहतात. त्यामुळे त्यांच्यात जातीवाद, प्रांतीय वाद, धार्मिकवाद, भाषावाद निर्माण होवू शकतो. अशा विविधतेने घेरलेल्या या देशाचे ऐक्य व एकात्मता कायम ठेवण्यासाठी नागरीकांमध्ये बंधुत्वाची भावना निर्माण करणे गरजेचे आहे. याची संविधानकारकांना जाणीव होती आणि म्हणूनच त्यांनी न्याय, स्वातंत्र्य व समता यांच्या आधारे बंधुत्वाची भावना निर्माण करण्याचे उद्दिष्ट राज्यव्यवस्थेसमोर ठेवले. राष्ट्राचे ऐक्य व एकात्मता कायम ठेवण्यासाठी व व्यक्तीची प्रतिष्ठा जपण्यासाठी बंधुत्वाची भावना भारतीयांमध्ये निर्माण केली जाईल. आपण एक आहोत हे लक्षात ठेवून नागरीकांना परस्परांशी व्यवहार केला तरच या



देशाचे ऐक्य व एकात्मता टिकून राहू शकेल. [illegible] बंधुता या उद्देशाला भारताचे पारंपारीक वैशिष्ट साध्य होण्याच्या हेतूने स्विकार केला असल्याने त्याला विशेष अर्थ प्राप्त होतो.

**उद्देशपत्रिकेचे महत्व:**

अनेक मान्यवरांनी भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेबद्दल आनंद व्यक्त करून आपली प्रशंसात्मक मते व्यक्त केली आहेत.

एम. व्हि. पायली यांच्या मते "भारतीय संविधानाचा सरनामा इतर देशांच्या सरनाम्याहून अधिक उत्कृष्ट व अद्वितीय आहे".

श्री कनैयालाल मुन्शीच्या मते भारतीय संविधानाचे तत्वज्ञान मांडणारी ही एक राजकीय कुंडली आहे.

ज्या सुंदर व अर्थपूर्ण शब्दात उद्देशपत्रिकेची रचना करण्यात आली आहे. त्यामुळे प्रभावित होवून पंडीत ठाकूरदास भार्गव यांनी तिचे पुढीलप्रमाणे वर्णन केले.

"The preamble is the most precious part of constitution. It is the soul of constitution. It is a key to the constitution, it is the jewel set in the constitution. It is a superb prosperous nay it is a perfection itself".

उद्देशपत्रिका वाचून बेहद खुष झालेल्या अर्नेस्ट बाक्रने "The Principles of social and political theory" या ग्रंथाच्या सुरूवातीलाच ही उद्देशपत्रिका जशीच्या तशी उध्दृत करून तिचे महत्व स्पष्ट केले. याबाबत खुलासा करतांना ते म्हणतात की "या पुस्तकात मला जे काय म्हणावयाचे आहे ते या उद्देशपत्रिकेत थोडक्यात पण जोरदार भाषेत प्रतिपादन करण्यात आले आहे".

श्री जी.एन. जोशींच्या मते, उद्देशपत्रिका ही संविधनाच्या पुढे चालते आणि संविधानाचा उगम, आधार आकृतिबंध, उद्दिष्टाचे व आशय यांचे दिग्दर्शन करते.

श्री सुब्बाराव यांच्या मते भारतीय संविधनचा सरनामा हा संपूर्ण संविधान जाणून घेण्याचा एक योजनाबध्द आराखडा आहे.

अशा प्रकारे संविधानातील सर्व कलमांची कसोटी ज्याच्या आधारे निश्चित होते असा मानदंड किंवा निकष म्हणजे उद्देशपत्रिका होय. या उद्देशपत्रिकेमुळे भारतीय राजकीय व्यवस्थेचे लक्ष निश्चित झाले आहे. जनता हा सार्वभौम राजसत्तेचा स्त्रोत आहे हे स्पष्ट होते. तसेच शासनास राज्यकारभार चालवतांना पथदर्शकांचे काम ही उद्देशपत्रिका करते हयातच या उद्देशपत्रिकेचे महत्व सामावले आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची:**


१) भारत सरकार, विधी न्याय व कंपनी कार्य मंत्रालय, भारत
संविधान (पाचवी आवृत्ती)

2) देशमुख, प्रा. बी.टी. भारतीय संविधान, पिंपळपुळे ॲड. के. पब्ली
नागपुर

3) कुलकर्णी, प्रा.बी.वाय. नाईकवाडे, प्रा.अ.भा. भारताचे शासन
राजकारण, श्रीविद्या प्रकाशन पुणे,

4) देशमुख, डॉ. अलका, भारतीय शासन आणि राजकारण, श्री
प्रकाशन, नागपुर

5) डॉ. भोळे, भा.ल. भारताचे शासन आणि राजकारण, पिंपळपुळे
पब्लीशर्स, नागपुर